# नोटीस

**सेंद्रिय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे**

**विषय : ठेका पध्दतीने कामे करण्यासाठी दरपत्रक देण्याबाबत .......**

कृषि विद्या विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली येथे कार्यान्वित असलेल्या **'सेंद्रिय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे'** या योजनेमध्ये खरीप –२०२३ मध्ये विविध संशोधनात्मक प्रयोग घेण्यात येणार आहेत. सदर प्रयोगांची प्रक्षेत्रावरील विविध कामे ठेका पध्दतीने करून घेण्याकरिता आपण काय दराने कामे कराल, त्याचे दरपत्रक **प्रकल्प प्रमुख, सेंद्रिय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे, कृषि विद्या विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली** यांचे नांवे **दिनांक ३१/१०/२०२३** रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत किंवा तत्पुर्वी पोहोचतील अशा बेताने सिलबंद पाकिटातून पाठवावे. पाकिटावर **ठेकापध्दतीने करावयाची कामे करण्याकरीता दरपत्रक** असा उल्लेख करावा.

| अ. क्र. | कामाचा प्रकार | क्षेत्र (हे.)/ संख्या | कामाचा कालावधी | एकूण युनिटस् | दर प्रती युनिटस् (रु.) | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| | **नोव्हेंबर– २०२३** | | | | | |
| १. | **प्रयोगांची नावे**<br>**१. भातातील सेंद्रिय खत व्यवस्थापन**<br>**२. भातातील सेंद्रिय तण व्यवस्थापन**<br>**३. नागलीतील सेंद्रिय खत व्यवस्थापन**<br>**४. सेंद्रिय आंबा व्यवस्थापन**<br>**५. भातामध्ये सेंद्रिय, योगीक शेती व झिरो बजेट नैसर्गिक शेतीचा अभ्यास**<br>**६. आंबा पिकांमधील सेंद्रिय आंतरपिक व्यवस्थापन**<br>**७. सेंद्रिय कंदपिके व्यवस्थापन**<br>**८. भातावरील निळे भुंगेऱ्यांचे सेंद्रिय पध्दतीने व्यवस्थापन**<br>**९. दुधी भोपळामध्ये वाढ आणि उत्पादन यावर छाटणीचा परिणाम अभ्यासणे**<br>प्रयोगातील कामे –: भात व नागलीची कापणी, रब्बी प्रयोग लागवडीकरीता पुर्व मशागत, नर्सरीसाठी गादीवाफे तयार करणे, बियाणे पेरणी करणे, किड आणि रोगांच्या नियंत्रणासाठी औषध फवारणी करणे, बांध सफाई करणे, बेणणी करणे, राखण करणे, निरीक्षणे घेण्यास मदत करणे, मातीचे व पिकांचे नमुने घेणे, प्रयोगशाळेतील भांडी स्वच्छ करणे व मातीचे नमुने पृथ्थ:करणाविषयीच्या कामात मदत करणे, प्रकल्पाच्या मुख्य इमारतीची साफसफाई करणे, सेंद्रिय खतांची निर्मिती करणे, इत्यादी. | एकूण १.५० हे. | ३० दिवस | २४० युनिटस् | | |
| २. | **गाईंचे संगोपन करणे –**<br>गोठा साफ करणे, अझोला निर्मिती करणे, गुरे चरविणे, गाईचे गोमुत्र व शेण जमा करणे, गुरांची देखभाल करणे, औषध फवारणी करणे, कोंबडयांना खाद्य व पाणी देणे व कोंबडी शेडची स्वच्छता करणे इत्यादी कामे | १६ गायवर्ग, ६१ कोंबडया | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **डिसेंबर – २०२३** | | | | | |
| १. | **प्रयोगांची नावे**<br>**१. भुईमूगातील सेंद्रिय खत व्यवस्थापन**<br>**२. वांग्यातील सेंद्रिय तण व्यवस्थापन**<br>**३. सेंद्रिय आंबा व्यवस्थापन**<br>**४. वांगी व चवळीमध्ये सेंद्रिय, योगीक शेती व झिरो बजेट नैसर्गिक शेतीचा अभ्यास**<br>**५. आंबा पिकांमधील सेंद्रिय आंतरपिक व्यवस्थापन**<br>**६. सेंद्रिय कंदपिके व्यवस्थापन**<br>**७. मिरचीवरील रस शोषणाऱ्या किटकांचे विविध बुरशी वापरून नियंत्रण करणे**<br>**८. दुधी भोपळामध्ये वाढ आणि उत्पादन यावर छाटणीचा परिणाम अभ्यासणे**<br>**९. वांगीवरील जिवाणुजन्य मर रोगाचे सेंद्रिय पध्दतीने व्यवस्थापन**<br>प्रयोगातील कामे –: वांगी,मिरचीची लागवड करणे, रब्बी प्रयोग चवळी व भुईमूग बियाणे पेरणी करणे, आंबा प्रयोगातील किड आणि रोगांच्या नियंत्रणासाठी औषध फवारणी करणे, बांध सफाई करणे, बेणणी करणे, राखण करणे, निरीक्षणे घेण्यास मदत करणे, प्रयोगशाळेतील भांडी स्वच्छ करणे व मातीचे नमुने पृथ्थःकरणाविषयीच्या कामात मदत करणे, प्रकल्पाच्या मुख्य इमारतीची साफसफाई करणे, सेंद्रिय खतांची निर्मिती करणे, इत्यादी. | एकूण<br>१.५० हे. | ३१<br>दिवस | २४८<br>युनिट्स | | |
| २. | **गाईंचे संगोपन करणे –**<br>गोठा साफ करणे, अझोला निर्मिती करणे, गुरे चरविणे, गाईचे गोमुत्र व शेण जमा करणे, गुरांची देखभाल करणे, औषध फवारणी करणे, कोंबडयांना खाद्य व पाणी देणे व कोंबडी शेडची स्वच्छता करणे इत्यादी कामे | १६<br>गायवर्ग,<br>६१<br>कोंबडया | | | | |

**अटी व शर्थी:–**

१) कामाच्या विषयी या विभागाकडे विचारणा करावी म्हणजे त्याप्रमाणे कामे करता येतील.
२) कामे कार्यालयीन वेळेत म्हणजेच सकाळी ८.०० ते १२.०० व दुपारी २.००ते ५.३० या वेळेतच करावी लागतील.
३) कामासाठी लागणारे सर्व साहित्य या विभागा मार्फत पुरविले जाईल.
४) कामाचे मुल्यमापन करूनच बील अदा करण्यात येईल.
५) सोबत दरपत्रकाचा नमुना जोडण्यात आलेला असून त्यातच दर भरून द्यावेत.

**प्रकल्प प्रमुख,**
सेंद्रिय शेती संशोधन व
प्रशिक्षण केंद्र, कृषि विद्या विभाग, कृषि
महाविद्यालय, दापोली

जा.क्र.कृमविदा/कृविवि/सेंद्रिय शेती/ ७४८ /२०२३,
कृषि विद्या विभाग,कृषी महाविद्यालय, दापोली.
दिनांक – 16 OCT 2023

**प्रत माहितीसाठी सविनय सादर:**

१) **मा. सहयोगी अधिष्ठाता,** कृषि महाविद्यालय, दापोली, जि. रत्नागिरी
२) **मा. तहसिलदार,** तहसिलदार कार्यालय, दापोली, जि. रत्नागिरी

३) **दापोली नगरपंचायत दापोली,** जि. रत्नागिरी

४) **ग्रामपंचायत, गिम्हवणे,** ता. दापोली जि. रत्नागिरी

५) **ग्रामपंचायत, जालगांव,** ता. दापोली जि. रत्नागिरी

**प्रत प्रसिध्दीसाठी रवाना:**

१. **प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष**, डॉ. बा.सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
२/– यांना विनंती करण्यात येते की, सदर ठेक्याची नोटीस विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावे

# दरपत्रक

**सेंद्रिय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र, दापोली (2023-24)**

नांव ------------------------------------

पत्ता ------------------------------------

------------------------------------

**संदर्भ:** आपल्या कार्यालयाचे पत्र क्र.कृमविदा/कृविवि/सेंद्रिय शेती/ /२०२३, दिनांक

| अ. क्र. | कामाचा प्रकार | क्षेत्र (हे.)/ संख्या | कामाचा कालावधी | एकूण युनिटस् | दर प्रती युनिटस् (रु.) | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| | **नोव्हेंबर– २०२३** | | | | | |
| १. | **प्रयोगांची नावे**<br>**१. भातातील सेंद्रिय खत व्यवस्थापन**<br>**२. भातातील सेंद्रिय तण व्यवस्थापन**<br>**३. नागलीतील सेंद्रिय खत व्यवस्थापन**<br>**४. सेंद्रिय आंबा व्यवस्थापन**<br>**५. भातामध्ये सेंद्रिय, योगीक शेती व झिरो बजेट नैसर्गिक शेतीचा अभ्यास**<br>**६. आंबा पिकांमधील सेंद्रिय आंतरपिक व्यवस्थापन**<br>**७. सेंद्रिय कंदपिके व्यवस्थापन**<br>**८. भातावरील निळे भुंगेऱ्यांचे सेंद्रिय पध्दतीने व्यवस्थापन**<br>**९. दुधी भोपळामध्ये वाढ आणि उत्पादन यावर छाटणीचा परिणाम अभ्यासणे**<br>प्रयोगातील कामे —: भात व नागलीची कापणी, रब्बी प्रयोग लागवडीकरीता पुर्व मशागत, नर्सरीसाठी गादीवाफे तयार करणे, बियाणे पेरणी करणे, किड आणि रोगांच्या नियंत्रणासाठी औषध फवारणी करणे, बांध सफाई करणे, बेणणी करणे, राखण करणे, निरीक्षणे घेण्यास मदत करणे, मातीचे व पिकांचे नमुने घेणे, प्रयोगशाळेतील भांडी स्वच्छ करणे व मातीचे नमुने पृथ्थ:करणाविषयीच्या कामात मदत करणे, प्रकल्पाच्या मुख्य इमारतीची साफसफाई करणे, सेंद्रिय खतांची निर्मिती करणे, इत्यादी. | एकूण १.५० हे. | ३० दिवस | २४० युनिटस् | | |
| २. | **गाईंचे संगोपन करणे -**<br>गोठा साफ करणे, अझोला निर्मिती करणे, गुरे चरविणे, गाईचे गोमुत्र व शेण जमा करणे, गुरांची देखभाल करणे, औषध फवारणी करणे, कोंबडयांना खाद्य व पाणी देणे व कोंबडी शेडची स्वच्छता करणे इत्यादी कामे | १६ गायवर्ग, ६१ कोंबडया | | | | |

| डिसेंबर – २०२३ | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | **प्रयोगांची नावे**<br>**१. भुईमूगातील सेंद्रिय खत व्यवस्थापन**<br>**२. वांग्यातील सेंद्रिय तण व्यवस्थापन**<br>**३. सेंद्रिय आंबा व्यवस्थापन**<br>**४. वांगी व चवळीमध्ये सेंद्रिय, योगीक शेती व झिरो बजेट नैसर्गिक शेतीचा अभ्यास**<br>**५. आंबा पिकांमधील सेंद्रिय आंतरपिक व्यवस्थापन**<br>**६. सेंद्रिय कंदपिके व्यवस्थापन**<br>**७. मिरचीवरील रस शोषणाऱ्या किटकांचे विविध बुरशी वापरून नियंत्रण करणे**<br>**८. दुधी भोपळामध्ये वाढ आणि उत्पादन यावर छाटणीचा परिणाम अभ्यासणे**<br>**९. वांगीवरील जिवाणुजन्य मर रोगाचे सेंद्रिय पध्दतीने व्यवस्थापन**<br>प्रयोगातील कामे –: वांगी,मिरचीची लागवड करणे, रब्बी प्रयोग चवळी व भुईमूग बियाणे पेरणी करणे, आंबा प्रयोगातील किड आणि रोगांच्या नियंत्रणासाठी औषध फवारणी करणे, बांध सफाई करणे, बेणणी करणे, राखण करणे, निरीक्षणे घेण्यास मदत करणे, प्रयोगशाळेतील भांडी स्वच्छ करणे व मातीचे नमुने पृथ्थ:करणाविषयीच्या कामात मदत करणे, प्रकल्पाच्या मुख्य इमारतीची साफसफाई करणे, सेंद्रिय खतांची निर्मिती करणे, इत्यादी. | एकूण<br>१.५० हे. | ३१<br>दिवस | २४८<br>युनिट्स | | |
| २. | **गाईंचे संगोपन करणे -**<br>गोठा साफ करणे, अझोला निर्मिती करणे, गुरे चरविणे, गाईंचे गोमुत्र व शेण जमा करणे, गुरांची देखभाल करणे, औषध फवारणी करणे, कोंबडयांना खाद्य व पाणी देणे व कोंबडी शेडची स्वच्छता करणे इत्यादी कामे | १६ गायवर्ग,<br>६१<br>कोंबडया | | | | |

तरी मला सदर कामाचा ठेका देण्यात यावा, ही विनंती.

दिनांक :

सही———————————

ठिकाण : दापोली

नांव————————————

**ठेक्याबाबतच्या सर्वसाधारण अटी व शर्थी:–**

१) ठेकेदाराने नियुक्त केलेल्या मजुरांचा पोस्टाच्या कार्यालयाकडुन पी.एल.आय. विमा काढुप त्याची प्रत या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

२) प्रक्षेत्रावरील कामे संबधित प्रकल्प प्रमुख/विभाग प्रमुख विभागाच्या आवश्यकतेनुसार नेमुन देतील त्याप्रमाणे करणे बंधनकारक राहील.

३) कामाच्या देयकाची अदायगी महिना पुर्ण झाल्यावर केली जाईल.

४) निविष्ठांचा पुरवठा या विभागामार्फत केला जाईल.

५) ठेकेदाराकडे स्वत:चे पॅन कार्ड व बॅंक खाते असणे आवश्यक आहे. तसेच ठेकेदाराने कामगारांना कामाचे वेतन व त्याअनुषंगिक रक्कम संबधित कामगाराच्या बॅंक खाती जमा करणे आवश्यक आहे.

६) ठेकेदाराने नेमलेल्या मजुरांना शासनाच्या किमान वेतन दरानुसार वेतन दिले जाते असे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

७) प्रक्षेत्रावरील मालमत्तेचे कामगारांकडुन नुकसान झाल्यास ठेकेदारास जबाबदार धरले जाईल.

८) ठेक्यामधील असलेल्या मजुरांव्यतिरिक्त प्रक्षेत्रावर गरजेनुसार ज्यादा मजुर विहित कार्यपध्दती अवलंबुन नेमण्याचा अधिकार संबधित प्रकल्प प्रमुख तथा विभाग प्रमुख यांचा राहील.

९) ठेक्यातील मजुरांची किमान व कमाल वयोमर्यादा शासननिर्णयानुसार निश्चित केलेली असावी.

१०) याचिका क्रमांक १५९१/२०१८ संदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक १८ एप्रिल २०१८ च्या निर्णयानुसार अंतरिम स्थगितीस अनुसरून परिच्छेद क्रमांक ५६(ई) नुसार याचिकाकर्त्या मजुरांना ठेकेदाराने ठेकेदाराने सामावुन घेणे आवश्यक आहे.

११) ठेकेदारामार्फत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठ प्रशासनावर राहणार नाही.

१२) ठेकेदार व्यक्तीस उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

१३) ठेक्यासंबधी इतर सर्व अधिकार प्रकल्प प्रमुख/विभाग प्रमुख/विद्यापीठ प्रशासनाला राहतील.

# प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीमती..........................................................................प्रतिज्ञापत्र लिहुन देतो की सेंद्रिय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र, दापोली येथील ठेका भरण्यासाठी पत्र क्र.कृमविदा/कृविवि/सेंद्रिय शेती/ /२०२३, दिनांक.................ठेका मागविण्यात आलेला आहे. सदर ठेक्याच्या पत्रामध्ये उपरोक्त नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती मला समजल्या असुन मला त्या पुर्ण मान्य आहे. सदर अटी व शर्तीनुसार मी ठेक्यामधील कामे पुर्ण करून कार्यवाही करेन.

दिनांक:

ठिकाण:

स्वाक्षरी.........................................................

ठेकेदाराचे पुर्ण नाव...........................................

पत्ता...........................................................